# प्रेस नोट

## सर जे जे रूग्णालय, मुंबई येथील रूग्णांचे नातेवाईकांचे चोरीस गेले ०७ मोबाईल सराईत आरोपीकडून हस्तगत करून ०३ गुन्हे उघड केले.

सर जे जे मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. ४७६/२०२६, कलम ३०५ (अ) भा.न्या.सं. या गुन्हयाचे घटनास्थळी दि. १६/०६/२०२६ रोजी पोउनि सैफन कुरणे व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी भेट देवून तपास केला असता एक संशयित इसम गुन्हा घडतेवेळी घटनास्थळा जवळ घुटमळत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये दिसुन आले, त्यावरून तांत्रिक तपासाच्या आधारे त्याचे छायाचित्र प्राप्त करून छायाचित्रचे आधारे आरोपीचा शोध घेतला असता, नमुद संशयीत व्यक्ती हा सर जे.जे. रूग्णालय परिसरात पुन्हा चोरीच्या उद्देशाने येणार असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यावरून नमुद पथकाने वेषांतर करून सदर ठिकाणी सापळा रचला व संशयित आरोपी सदर ठिकाणी येताच त्यास शिताफिने ताब्यात घेवून त्याचेकडे कसुन तपास केला असता त्याने त्यांचे नाव सागर श्याम पारखे, वय- २४ वर्षे, पत्ता- रूम नं ४७०, माया चाळ, महाराष्ट्र नगर, मानखुर्द, मुंबई सांगून सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले. नमुद आरोपीकडून पंचनाम्यांतर्गत सर जे जे रूग्णालयामधुन चोरी केलेले एकुण ०७ मोबाईल आरोपीचे निवेदन पंचनाम्याअंतर्गत त्यांचे राहते घरातून हस्तगत करण्यात आले असुन, सर जे जे मार्ग पोलीस ठाणेचे उक्त नमुद गुन्हयासह गु.र.क्र. ४७८/२०२६ व गु.र.क्र. ४७९/२०२६ कलम ३०३(२) भा.न्य.सं. असे एकुण ०३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ-१,मुंबई श्री. मनीष कलवानिया याचे आदेशाने मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री. तनवीर शेख श्री. रईस शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे,मुंबई,पोलीस निरीक्षक मुकुंदा वाघमोडे (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि सैफन कुरणे (गुन्हे प्रकटीकरण अधिकारी),पो.हे.कॉ. ०४१०४३/शिंदे, पो.ह.कॉ. ०६०३८६/ जाधव, पो.शि. ०९०४३७/बोडके, पो.शि.०९०६७५/भोळे,पो.शि. १३०८४९/काळे, १४०७१८/धात्रक यांनी सदरची कामगिरी केली आहे.

